# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय सभा दिनांक १९/१२/२०२२

---

## कार्यवृत्त

आज दिनांक १९/१२/२०२२ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या बांधकाम विभाग यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

विषय क्र.१ :- नगरोत्थान योजने अंतर्गत न.प. मलकापूर हद्दीतील विकास कामांना मंजुरी देण्या बाबत.

विषय क्र.२ :- न.प. मलकापूर क्षेत्रात विशिष्ठ नागरी सेवा योजने अंतर्गत विकास कामांना मंजुरी देण्या बाबत.

---

**विषय क्र १ :- नगरोत्थान योजने अंतर्गत न.प. मलकापूर हद्दीतील विकास कामांना मंजुरी देण्या बाबत.**

वरील विषयाची नगर अभियंता बांधकाम विभाग यांच्या विषयावरील मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, उपरोक्त विषया संदर्भात मा. रक्षाताई खडसे रावेर लोकसभा मतदार संघ यांचे पत्र क्र मु.अ./५८३/२०२२ दि ०९/११/२०२२ नुसार नगरोत्थान योजने अंतर्गत न.प. मलकापूर हद्दीतील विकास कामांना मंजुरी होवून नधी उपलब्धतेबाबत मा. ना. श्री गुलाबरावजी पाटील, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा पालकमंत्री बुलढाणा जिल्हा यांना पत्राद्वारे विनंती केली आहे. त्यानुसार करावयाची विकास कामे खालील प्रमाणे.

१) मलकापूर शहर अंतर्गत नांदुरा रोड ते श्री मुंधडा यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकारण करणे

२) मलकापूर शहर अंतर्गत अशोक नगर प्रमुख रस्ता कॉंक्रिटीकारण करणे.

३) मलकापूर शहर प्रभाग क्र ३ अविनाश जगदाळे यांचे घर ते अनिल भारुका यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकारण करणे.

४) मलकापूर शहर प्रभाग क्र ३ सुभाष कुकडे यांचे घर ते भागवत पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकारण करणे.

५) मलकापूर शहर प्रभाग क्र ३ अग्रवाल यांचे घर ते गजानन निंबाळकर यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रिटीकारण करणे.

६) मलकापूर शहर श्री स्वामी समर्थ केंद्र मधुमालती नगर येथे स्वच्छता गृह वॉटर प्रूफसह २ खोली बांधकाम व परिसरात पेव्हर ब्लोक बसविणे

७) मलकापूर शहर अंतर्गत बुरोड तुलसी ज्वेलर्स पासून ते भातृमंडल रोड मराठा मंगल कार्यालय कडे जाणारा रस्ता डांबरीकरण व नुतनीकरण करणे.

८) मलकापूर शहर अंतर्गत नसवाला चौक ते लख्खाणी चौक रस्ता व गटार कॉक्रिटीकारण करणे.

तरी सदरची कामे नागरिकांच्या सोयी व सुविधांच्या दृष्टीने करणे गरजेचे असल्याचे नगर अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालात नमूद केलेले आहे. त्यानुसार मुख्याधिकारी यांनी सदर बाब सभेच्या निदर्शनास आणून दिली.

वरील सर्वबाबींचा विचार करता, नागरि सोयी सुविधांकरिता न.प. हद्दीतील करावयाच्या विकास कामांच्या कार्यवाहीस व येणारा खर्च नागरोत्थान योजना निधीतून करण्यास ही सभा मान्यता देत आहे

**विषय क्र.२ :- न.प. मलकापूर क्षेत्रात विशिष्ठ नागरी सेवा योजने अंतर्गत विकास कामांना मंजुरी देण्या बाबत.**

वरील विषयाची नगर अभियंता बांधकाम विभाग यांच्या विषयावरील मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विर्स्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात अधिसुचीत विशिष्ठ नागरी सुविधा पुरविण्याबाबत न.प. हद्दीतील विविध प्रभागात नागरिकांच्या सोयींच्या दृष्टीने काही विकास कामे करावयाची असल्याचे नगर अभियंता यांनी सादर केलेल्या अहवाला द्वारे नमूद केलेले आहे. त्यानुसार करावयाची विकास कामे खालील प्रमाणे.

१) न.प. हद्दीतील पुरोहित कॉलोनी मधील ओपन स्पेस मध्ये सभागृहचे बांधकाम करणे बाबत.

२) न.प. हद्दीतील मुकुंदनगर मधील ओपन स्पेस मध्ये सभागृहचे बांधकाम करणे बाबत.

तरी सदरची कामे नागरिकांच्या सोयी व सुविधांच्या तसेच शहराच्या विकासाच्या दृष्टीने करणे गरजेचे असल्याचे नगर अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालात नमूद केलेले आहे. त्यानुसार मुख्याधिकारी यांनी सदर बाब सभेच्या निदर्शनास आणून दिली.

वरील सर्वबाबींचा विचार करता, शहर विकास व नागरिकांच्या सोयी सुविधा करिता न.प. मलकापूर हद्दीतील करावयाच्या विकास कामांच्या कार्यवाहीस व येणारा खर्च विशिष्ठ नागरी सेवा योजना निधीतून करण्यास ही सभा मान्यता देत आहे

**आर यु सुरडकर**
**प्रशासक**
**नगरपरिषद मलकापूर**